वसई विरार शहर महानरपालिका
प्रभाग समिती – जी वालीव
दुरध्वनी : ०२५० – २४५३४४०
वालीव नाका, वसई (पुर्व)
ता.वसई, जि. पालघर, ४०१ २०८

ई मेल:
prabhagsamitiwaliv@gmail.com
जावक क्र. व.वि.श.म./१९७६/२०२४-२५
दिनांक :- ११ / १०/२०२४

# तृतीय फेर जाहीर दरपत्रक

याव्दारे सर्व संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' वालिव कार्यक्षेत्रातील खालील यादीतील नमुद केल्याप्रमाणे तलाव दि.१७/०९/२०२४ ते दि. ३१/०५/२०२७ या कालावधीकरिता ठेका पध्दतीने मत्स्यसंवर्धनकरीता देणेकामी दरपत्रक मागिविणेकामी जाहिर दरपत्रक सुचना दि.१४/१०/२०२४ रोजी ११.०० वाजेपासुन ते दि. २१/१०/२०२४ रोजी सायं ४.०० वाजे पर्यत महानगरपालिकेच्या ( vvcmc.in) या संकेतस्थळावर तसेच प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येत आहे. इच्छुक दरपत्रधारकाने सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दि.२१/१०/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यत प्रभाग समिती 'जी' कार्यालयाच्या आवक-जावक विभागात सादर करावेत.

| अ क्र | तलावाचे नाव | किमान देकार रक्कम |
|---|---|---|
| १ | सातिवली तलाव | ३९,०२०/- |
| २ | गोडे तलाव ,जुचंद्र | २,५०,५५५/- |
| ३ | कसराचा तलाव, कामण | १,६९,३१९/- |
| ४ | आंबे तलाव, कामण | १,१०,७४५/- |
| ५ | सोनु देवी तलाव, राजावली | ६१,३२१/- |
| ६ | पिराचा तलाव , राजावली | १,०३,९९५/- |
| ७ | वनीचा तलाव, राजवली | २,२७,१०४/- |

१) वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' वालीव यांनी तयार केलेल्या फॉर्म मध्ये दरपत्रक धारक यांनी दरपत्रक सादर करावे.

२) दरपत्रक निविदा फॉर्म चे रक्कम रु. ५००/- भरल्यानंतर फॉर्म अदा करण्यात येईल.

३) दरपत्रक सादर करताना खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करण्यात यावी.
1. आधारकार्ड 2.पॅनकार्ड 3. बँक स्टेटमेंट (सन २०२३-२४) 4.इसारा रक्कम भरलेबाबतची पावती
5.सन २०२४-२५ घरपट्टी भरणा पावती 6.प्रतिज्ञापत्र

४) वरील तलावाच्या मंजुर रक्कमेवर २% आयकर व सर्व शासकीय कर भरणा करणे मंजुर दरपत्रक धारकावर बंधनकारक असेल.

५) दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती (जी) वालीव यंथे आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.

६) दरपत्रकातील मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून ५०० रुपये स्टॅम्प पेपरवर ७ दिवसांत करारनामा करुन करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करणेत येईल.

७) जास्त देकार देणा-या व्यक्ती अथवा संस्था यांचे दरपत्रक मंजुर करणेत येईल व मंजुर रक्कमेवर शासनाच्या दरानुसार आयकर व सर्व शासकीय कर भरणा करावा लागेल.

८) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेला आहे.

९) वरील अटींचे पालन जे दरपत्रक धारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.

१०) वरील तलावांची दरपत्रके बंद लिफाफयात दि. २१ /१०/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता प्रभाग समिती -जी वालीव आवक जावक येथे सादर करावीत.

१०) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.२२/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता अथवा तद्नंतर सोयीनुसार मा.सहा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकधारक अथवा प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यांत येतील.

११/१०

(समीर भूमकर)
उपायुक्त (तलाव विभाग)
वसई विरार शहर महानगरपालिका